




Title Code- MAHMAR-51647

दैनिक निडर निर्भिड

# जनसंचलन

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे | अंक : ७९०. वा | रविवार | दि. ०२ जून २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये







# आरबीआय ने ब्रिटनच्या तिजोरीतून तब्बल १०० टन सोने परत आणले...

## भारताच्या अर्थव्यवस्थेवर होणार परिणाम...

वृत्तसंस्था/नवी दिल्ली

रिझर्व बँक ऑफ इंडिया अर्थात आरबीआय ने ब्रिटनमधून १०० टनाहून अधिक सोने देशात परत आणले आहे भारतासाठी ही मोठी उपलब्धी आहे त्याचा परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवरही होणार आहे खरे तर १९९१ नंतर प्रथमच आरबीआय ने ब्रिटनमधून १०० टनाहून अधिक सोने आपल्या देशात राखीव ठेवीमध्ये हस्तांतरित केले आहे या मौल्यवान धातूचा एवढा मोठ्या प्रमाणावर स्थानिक स्टॉक मध्ये समावेश होण्याची ही पहिलीच वेळ आहे ताज्या आकडेवारीनुसार मार्च अखेर आरबीआयकडे ८२२.१ टन सोने होते. यातील ४१३.८ टन सोने रिझर्व बँकेने परदेशात ठेवले आहे गेल्या आर्थिक वर्षात आरबीआय ने आपल्या साठ्यात २७.५ टन सोन्याची भर घातली आहे. १९९१ मध्ये भारताला परकीय चलनाच्या संकटाचा सामना करावा लागला ज्यामुळे सरकारला आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आय एम एफ कडून मदत मिळवण्यासाठी सोनी गहाण ठेवावे लागले त्यावेळी आर्थिक संकटाचा सामना करण्यासाठी हा निर्णय आवश्यक असल्याचे मानले गेले आता तीन दशकानंतर प्रदेशात ठेवले ते सोने देशातील राखीव ठेवीमध्ये हस्तांतरित करण्यात आले आहे हे देशाच्या आर्थिक प्रगतीचे प्रतिबिंब असल्याचे अनेक अर्थतज्ञांचे मत आहे. अर्थतज्ञ संजू संन्याल यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्स वरून केलेल्या पोस्टमध्ये म्हटलं की आता भारत आपले बहुतेक सोने स्वतःच्या राखीव ठेवीत ठेवले आरबीआय ने ब्रिटनमधून सोन्याच्या राखीव भंडारातून १०० टन सोने परत मागवले बहुतेक देश त्याचे सोने बँक ऑफ इंग्लंड किंवा काही तत्सम ठिकाणी तिजोरी ठेवतात यासाठी ते शिल्लक देखील भरावे लागते १९९१ साली आर्थिक संकटाच्या वेळी आम्हाला आमचे सोने बाहेर पाठवावे लागले होते पण आम्ही १९९१ पासून खूप पुढे आलो आहोत. या अहवालानुसार येत्या काही महिन्यात देशात १०० टन सोने परत येऊ शकते मार्च २०२४ अखेरपर्यंत आरबीआय कडे ८२२.१ टन सोने होते त्यापैकी ४१३.८ टन परदेशात ठेवले आहे त्यापैकी १००.३ सोनी भारतात तर ४१३.८ टन सध्या परदेशात आहे याशिवाय भारतात नोटा जारी करण्यासाठी ३०८ टन सोने ठेवण्यात आले आहे गेल्या आर्थिक वर्षाच्या तुलनेत आरबीआय ने सोन्याच्या साठवणुकीत २७.५ टन सोन्याची भर घातली आहे रिझर्व बँक ऑफ इंडिया ने ब्रिटनमधून १०० टनाहून अधिक सोने भारतात परत केले आहे ब्रिटनमध्ये जमा केलेले सोने भारतात आणून आरबीआयला मोठे यश मिळाले आहे १९९१ नंतर एवढ्या मोठ्या प्रमाणावर सोने भारतात परत येण्याची ही पहिलीच वेळ आहे आता परदेशात सोने का पोहोचले हा प्रश्न आहे यामागेही एक मोठी कथा आहे १९९१ च्या काळात देशात चंद्रशेखर यांचे सरकार होते देशाची तिजोरी रिकामी होती आर्थिक परिस्थिती डळमळीत होती देयकांची शिल्लक घसरली होती भारताचा परकीय चलनाचा साठा कोटी




रुपयावर पोहोचला होता ही रक्कम केवळ पंधरा दिवसांसाठी आयात सक्षम करण्यासाठी पुरेशी होती भारतासारख्या मोठ्या देशाच्या डबल घाईला आलेल्या अर्थव्यवस्थेला संकटातून बाहेर पडण्याचा कोणताही मार्ग नव्हता अर्थव्यवस्थेची स्थिती अशी होती की ती कधीही दिवाळखोरीत निघू शकते तेलाच्या किमती गगनाला भिडलेल्या होत्या अशा परिस्थितीत भारताच्या समस्येवर उपाय म्हणून सोने मदतीस आले त्यातूनच १९९१ मध्ये भारताला ब्रिटनमधून पैसे घेण्यासाठी सोने गहाण ठेवावे लागले

# सूतगिरणी व्यवस्थापकाकडून चिखलीच्या व्यापाऱ्यांची कोट्यवधींची फसवणूक

## महाराजा अग्रसेन खासगी बाजार समिती अध्यक्षांचा आरोप...

जनसंचलन/ चिखली

चिखली येथील एका खासगी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या व्यापाऱ्यांची कारंजा येथील सूतगिरणीच्या व्यवस्थापकाने कोट्यवधी रुपयांनी फसवणूक झाल्याचे समोर आले आहे. या संदर्भात बाजार समितीचे अध्यक्ष अशोक बाबूलाल अग्रवाल यांनी यासंदर्भात नागपूर येथील वस्त्रोद्योग आयुक्तांना पत्र पाठवून सविस्तर प्रकार सांगितला आहे. दरम्यान, या प्रकारामुळे व्यापाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. खासगी बाजार समितीचे अध्यक्ष अशोक अग्रवाल यांनी आयुक्तांना पाठवलेल्या पत्रात म्हटले आहे की, महाराजा अग्रसेन खासगी कृषी उत्पन्न बाजार समिती चिखली अंतर्गत कार्यरत व्यापारी-उद्योजक गोविंद अग्रवाल, दीपा अग्रवाल, अनुप अग्रवाल यांची कारंजा लाड येथील बाबासाहेब धाबेकर सहकारी सूतगिरणीचे व्यवस्थापक गणेश सुरंगळीकर यांनी ही फसवणूक केली. यासंदर्भात उद्योजक गोविंद अग्रवाल, दीपा अग्रवाल व अनुप अग्रवाल यांनी आधी चिखली पोलिस स्टेशन व त्यानंतर जिल्हा पोलिस अधीक्षक बुलढाणा यांना याबाबत तक्रार दिलेली आहे. या तक्रारीवर योग्य ती कार्यवाही न झाल्यामुळे संबंधित बाजार समितीचा अध्यक्ष या नात्याने मी फसवणूक झालेल्यांना न्याय व दोषींना शिक्षा होण्यासाठी प्रयत्न करीत होतो. दरम्यान, उद्योजकांसोबत झालेल्या फसवणुकीची योग्य ती दखल न घेतली गेल्यामुळे मी ५ जून पासून चिखली तहसील समोर उपोषणास बसण्याचा इशारा दिला होता. त्यानंतर सूतगिरणी प्रशासनाने हालचाली करून चिखली येथ आमदार श्वेताताई महाले यांच्या घरी तडजोडीसाठी बोलावले. त्या ठिकाणी चिखलीचे ठाणेदार संग्राम पाटील तसेच विद्याधर महाले हेदेखील उपस्थित होते. त्या ठिकाणी सूतगिरणीचे व्यवस्थापक सुरंगळीकर यांनी सांगितले की, सूतगिरणी प्रशासन पैसे परत करू शकत नाही, परंतु अग्रवाल कुटुंबीयांना सूतगिरणीत पडलेल्या १२० रुईच्या गठाणी व तीन-ते साडेतीन टन सूत आहे, ते दिले जाऊ शकते. यानंतर मग मी (अशोक अग्रवाल) स्वतः कारंजा लाड येथे रुईच्या गठाणी व सूत आणण्यासाठी गेलो. त्या ठिकाणी रात्री उशिरापर्यंत ट्रकमध्ये रुई गठाणी व सूत भरण्याचे काम चालले. दरम्यान, सुरंगळीकर यांनी मला एका नोटरीकडे नेऊन त्या ठिकाणी काही कागदपत्रांवर सह्या घेतल्या. ही सर्व प्रक्रिया करताना सुरंगळीकर यांनी मला अंधारात ठेवले. जेंव्हा मी या सर्व गठाणी आणि सूत घेऊन चिखलीला आलो आणि तेथे



पाहिले तर माझ्या पायाखालची वाळू सरकली. कारण त्या ट्रकमध्ये मोठ्या प्रमाणात निकृष्ट आणि टाकाऊ माल भरला. अशाप्रकारे सुरंगळीकर यांनी माझी व अग्रवाल कुटुंबीयांची मोठी फसवणूक केली, त्यामुळे या प्रकरणी दोषी असणाऱ्या सुरंगळीकर यांच्या विरोधात कठोर फौजदारी कारवाई करावी, अशी मागणी अग्रवाल यांनी केली आहे. अग्रवाल यांच्या मागणीवर पोलिस प्रशासन आणि वस्त्रोद्योग आयुक्त नेमकी काय भूमिका घेतात, हे आगामी काळात पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

# ज्ञानगंगा अभयारण्यातील स्वच्छतेवर देतात वन्यजीव सोयरे लक्ष...




**जनसंचलन/बुलढाणा**

ज्ञानगंगा अभयारण्यातील दारूच्या काचेच्या बॉटल वर देतात वन्यजीव सोयरे लक्ष ज्ञानगंगा अभयारण्यातील मार्गाच्या दुतर्फा रस्त्याने जाणाऱ्या येणाऱ्या प्रवाश्यानी तसेच सहलीसाठी आलेल्या लोकांनी दारुच्या, बियरच्या बाटल्या व प्लास्टिकच्या बाटल्या अनेक ठिकाणी फेकलेल्या जमा करण्याचे काम वन्यजीव सोयरे २०१६ पासून दरवर्षी सातत्याने करत आहेत. काचेचा तुटलेला छोटासा तुकडा आपण चालत असतांना आपल्या पायात रुतला तर आपला पाय रक्तबंबाळ होतो, ही सत्यता आहे. ज्ञानगंगा अभयारण्यात या फुटलेल्या दारूच्या काचेच्या बाटल्यांमुळे वन्यजीवास देखील धोका आहे. जसा आपला जीव आहे, तसा त्यांचा ही जीव आहे. या दारूच्या काचेच्या बाटल्यांमुळे आता पर्यंत कितीतरी वन्यजीवांना इजा झाल्या असतील. त्या मुक्या वन्यजीवांच्या शरीरातून ही रक्तस्त्राव झाला असेल. खर तर मित्रांनो मुक्या वन्यजीवांना इजा झाल्यावर ते बिचारे सांगणार कोणाला? त्यांचा उपचार करणार कोण? आपल्याला इजा झाल्यावर आपण लगेच दवाखाण्यात जाऊन उपचार करून घेऊ परंतु जंगलातील मुके वन्यजीव तशाच जखमा घेऊन आपल जीवन जगतात. या छोटया छोटया काचेच्या बाटलीच्या जखमांमुळे अनेक वन्यप्राण्यांना आपला जीव गमवावा लागला असेल. आपण या वन्यजीवांना आतापर्यंत झालेल्या जखमांचा उपचार तर करू शकत नाही परंतु या दारूच्या काचेच्या बाटल्यांपासून भविष्यात होणाऱ्या इजा थांबवू शकतो. याचा विचार करून २०१६ पासून दरवर्षी ज्ञानगंगा अभयारण्यातून दारूच्या, बियरच्या बाटल्या व प्लास्टिकच्या पिशव्या जमा केले. ५ जून २०१६ रोजी मोहीम आखून ज्ञानगंगा अभयारण्यातून ३५ पोते, ५ जून २०१७ जागतिकपर्यावरणदिनाचे औचित्य साधून ५ जून २०१७ रोजी रोजी मोहीम आखुन ज्ञानगंगा अभयारण्यातून २२ पोते, ५ जून २०१८ रोजी मोहीम आखून ज्ञानगंगा अभयारण्यातून २२ पोते, ५ जून २०१९ रोजी मोहिम आखून ज्ञानगंगा अभयारण्यातून ३० पोते, ५ जून २०२० रोजी मोहीम आखून या ज्ञानगंगा अभयारण्यातून २८ पोते, यावर्षी ५ जून २०२१ रोजी मोहिम आखून ज्ञानगंगा अभयारण्यातून १४ पोते, ५ जून २०२२ रोजी मोहीम आखून या ज्ञानगंगा अभयारण्यातून ४० पोते, ५ जून २०२३ रोजी मोहीम आखून ज्ञानगंगा अभयारण्यातून १४ पोते दारूची काचेची बॉटल उचलून प्लास्टिक कचरा उचलला या मोहिमेत विद्युत यंत्रणेसाठी लागनारे चीनी मातिचे साहित्य तसेच कृषिचे विषारी औषध अस्ताव्यस्थ फेकलेले निदर्शनास आले. याचा पाठपुरवठा आणि वन्यजीव सोयरेंच्या बॉटल मोहिमेचा असर किती प्रमाणात झाला याची शहानिशा करण्यासाठी ५ जून ङ्गजागतिक पर्यावरण दिनफ चे औचित्य साधून याही वर्षी स्वच्छता मोहीम आखलेली आहे. ५ जून हा न्यजीव सोयरे चळवळ बुलडाणाचा नऊवा वर्धापन दिन आहे.

ज्ञानगंगा अभयारण्यातून वन्यजीव सोयरे नितिन श्रीवास्तव यांनी आवाहन करत म्हटले आहे की, ज्ञानगंगा अभयारण्यातून जातांना येतांना कोणत्या ही प्रकारचा कचरा अभयारण्यात फेकू नये. आपल्या छोट्याश्या चुकी मुले एखाद्या वन्यजीवाला आपले प्राण गमवावे लागू शकते.

# जून ते सप्टेंबरमध्ये सर्वसाधारणपेक्षा जास्त पाऊस पडण्याची शक्यता

## दीर्घावधी पर्जन्यमानाच्या अंदाज जारी...

**जनसंचलन/बुलडाणा**

भारतीय हवामान खात्याने दीर्घावधी पर्जन्यमानाच्या अंदाज जाहिर केला आहे. त्यानुसार जून ते सप्टेंबरमध्ये सर्वसाधारणपेक्षा जास्त म्हणजेच १०६ टक्के पाऊस पडण्याची शक्यता वर्तवली आहे. दीर्घावधी पर्जन्यमानाच्या अंदाजानुसार देशात जून ते सप्टेंबर महिन्यात पडणाऱ्या पावसाची शक्यता १०६ % ( +- ४%) म्हणजे सर्वसाधारण पेक्षा जास्त अशी वर्तविण्यात आली आहे. ज्यामध्ये देशाची जून ते सप्टेंबर महिन्यातील पावसाची दीर्घकालीन सरासरी (१९७१ ते २०२० पर्यंतच्या पावसाची सरासरी) ही ८७ सेंमी. म्हणजेच ८७० मिमी. आहे. विभागनिहाय पावसाचा दीर्घावधी अंदाज पाहता मध्य भारतामध्ये ज्यात महाराष्ट्राचा समावेश आहे जून ते सप्टेंबर महिन्यात १०६ टक्के म्हणजेच सर्वसाधारणपेक्षा जास्त पाऊस पडण्याची शक्यता आहे. सध्याच्या जागतिक मॉडेलच्या अंदाजानुसार येत्या मान्सून हंगामात भारतीय समुद्रातील पाण्याचे तापमान येणाऱ्या मान्सूनसाठी सकारात्मक आहे. सन २०२१ पासून भारतीय हवामान खात्याने जून, जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर अशा चार महिन्यांचा स्वतंत्र दीर्घावधी पावसाचा अंदाज प्रसारित करण्यास सुरुवात केली आहे. या चार महिन्यांसाठी मासिक पर्जन्यमानाचा अंदाज वर्तविण्यासाठी भारतीय हवामानशास्त्र विभाग जागतिक स्तरावरील अनेक मॉडेल्स एकत्र करून



व प्रामुख्याने मान्सून मिशन संयुग्मित अंदाज प्रणालीचे मॉडेल वापरून अंदाज वर्तविते. या अंदाजान्वये जून महिन्यात मध्य भारतातील काही भागात सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडण्याची शक्यता आहे तर काही भागात सरासरीपेक्षा कमी पावसाची शक्यता आहे. जिल्ह्यात जून महिन्यात सरासरीएवढा पाऊस पडण्याची शक्यता आहे. भारतीय हवामान खात्याने मान्सून केरळमध्ये दाखल झाल्याचे जाहीर केले. त्यानुसार जिल्ह्यात मान्सूनच्या पावसाचे आगमन १३ ते १५ जूननंतर होईल. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये. पुरेसा पाऊस म्हणजेच ७५-१०० मिमी पाऊस सलग दोन तीन दिवसात पडल्यानंतर व जमिनीतील ओलावा १ फुट खोल लक्षात घेऊन पेरणीचा निर्णय घ्यावा व पेरणी वाफसा परिस्थितीत करावी. पावसाबाबत अद्ययावत अंदाज प्राप्त होण्यासाठी व खरीप पिकांसाठी शेतीतील दैनंदिन कामांचे सुयोग्य व सूक्ष्म व्यवस्थापन करण्यासाठी शेतकऱ्यांनी जिल्हा कृषी हवामान केंद्र, कृषी विज्ञान केंद्र यांच्याद्वारे आठवड्यातून मंगळवारी व शुक्रवारी प्रसारित होणाऱ्या हवामान आधारीत कृषी सल्ला पत्रिकेचा लाभ घ्यावा, तसेच खराब हवामान परिस्थितीत विजांपासून संरक्षण, सुरक्षा तथा जीवितहानी टाळण्यासाठी दामिनी मोबाईल ॲपचा वापर करावा, असे आवाहन कृषी हवामान तज्ज्ञ मनेश यदुलवार यांनी केले आहे. जिल्ह्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस पडण्याची दाट शक्यता असल्याने शेतकऱ्यांनी खरीपातील पिकांचे नियोजन करावे व त्यानुसार वाणांची निवड करावी. निवड केलेल्या वाणांची बाजारपेठेत उपलब्धता असल्याची पेरणीपूर्वी करावी. जून महिन्यात पेरणी करताना मातीतील ओलावा, पाऊसमान व कमाल तापमान आवर्जून लक्षात घ्यावे असे आवाहन वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अनिल तारू यांनी केले आहे.

# दुचाकीस्वाराचा दिवायडरला धडकून अपघात

## गंभीर जखमी दुचाकीस्वाराला वाहतूक विभागाच्या कर्मचाऱ्यांनी उपचारासाठी रूग्णालयात केले दाखल

**जनसंचलन/बुलडाणा**

बुलढाणा शहरात चिखली रोडवरील पोलिस पेट्रोलपंपाजवळ डिवायडर धडकून दुचाकीस्वाराचा अपघात झाला आहे.या अपघातामध्ये दुचाकीस्वार हा गंभीर जखमी झाला आहे.हा अपघात १ जून रोजी दुपारी ३.३० वाजेच्या सुमारास झाला आहे. यामध्ये दुचाकीस्वाराच्या पाठीला व डोक्याला गंभीर मार लागल्याने तो खाली कोसळला होता. चेतन पाडुरंग हरकाळ असे जखमी झालेल्या दुचाकीस्वाराचे नाव आहे त्यावेळेस कर्तव्यावर असलेले वाहतुक विभागाचे पीआय राठोड सर व पोलिस कर्मचारी पैठणे यांनी गंभीर दुचाकीस्वाच्या मदतीला लोकांना मदत मागितली मात्र लोक फक्त बघायची भुमीका घेत होते. कोणी व्हिडीओ काढत होते. मात्र मदतीला कोणी येत नव्हते तरी त्यामध्ये दोधे हे




मदतीला आले आहे यामध्ये शिक्षक पवन लहाने व रिक्षा चालक अजय जोशी यांनी सर्वांनी मदत करून त्या जखमी दुचाकीस्वाराला जिल्हा सामान्य रूग्णालय येथे उपचारासाठी दाखल केले आहे. सध्या जखमीवर उपचार सुरू असून पुढील उपचारासाठी त्याला खाजगी रूग्णालयत हलविण्यात आले आहे.

# गच्चीवरून पडून एकाचा मृत्यू

**जनसंचलन/खामगाव**

घराच्या गच्चीवर झोपलेल्या एका ४८ वर्षीय इसमाचा गच्चीवरून पडून मृत्यू झाला. ही घटना शनिवारी पहाटे स्थानिक दाळ फैलात घडली. विजय दशरथ बावणे असे मृतक इसमाचे नाव आहे. गच्चीवरून पडल्याने त्यांना शनिवारी पहाटे सामान्य रुग्णालयात दाखल केले असता त्यांना डॉक्टरांनी मृत घोषित केले.. याप्रकरणी वैद्यकीय अधिकारी डॉ. क्षीरसागर यांच्यावतीने कक्षसेवक



आशुतोष गजानन देशमुख यांनी दिलेल्या माहितीवरून शिवाजी नगर पोलीसांनी मृतक इसमाच्या मृत्यूप्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. घराच्या गच्चीवर झोपलेला असताना लघु शंकेसाठी उठले असता पाय घसरून ते पडल्याने अपघात झाल्याचे रुग्णालय सूत्रांनी सांगितले.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# अन्न प्रक्रिया उद्योगासाठी मिळणार तीन कोटींपर्यंत अनुदान...


## शेतकरी उत्पादक कंपन्यांसह गटांना प्राधान्य




**जनसंचलन/बुलडाणा**
स्थानिक, स्वदेशी, गावरान, सेंद्रिय पारंपारिक उत्पादनांना वाव देण्यासाठी केंद्र पुरस्कृत आत्मनिर्भर भारत मोहिमेंतर्गत प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना कृषी विभागामार्फत राबविण्यात येत आहे. यात कृषी प्रक्रिया उद्योजक उभारणीसाठी प्रकल्पाच्या ३५ टक्के, तसेच कमाल तीन कोटी रुपयांचे अनुदान दिले जाणार आहे. यात शेतकरी उत्पादक कंपन्यांसह शेतकरी गटांना प्राधान्य देण्यात येणार आहे. नव्याने स्थापित होणाऱ्या किंवा सद्यस्थितीत कार्यरत सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांना विस्तारीकरण, स्तरवृद्धीसाठी या योजनेतून एक जिल्हा एक उत्पादन यावर आधारित कृषी प्रक्रिया उद्योगांना प्राधान्य दिले जाणार आहे. या योजनेंतर्गत भांडवली गुंतवणूक, सामाईक पायाभूत सुविधा, इनक्युबेशन सेंटर, स्वयंसहाय्यता गटाच्या सदस्यांना बिज भांडवल, मार्केटींग व ब्रॅन्डीग आदी करिता अर्थसहाय्य देण्यात येत आहे. वैयक्तिक सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांना प्रकल्प किमतीच्या ३५ टक्के किंवा जास्तीत जास्त १० लाख तर सामाईक पायाभूत सुविधा, इन्क्युबेशन केंद्र, मुल्यसाखळी घटकांसाठी प्रकल्प किमतीच्या ३५ टक्के किंवा कमाल ३ कोटी अर्थ सहाय्य देण्यात येणार आहे. उद्योजक, शेतकरी, बेरोजगार युवक, महिला, भागीदारी संस्था, तसेच गट लाभार्थीमध्ये शेतकरी उत्पादक गट, कंपनी, संस्था, स्वयंसहाय्यता गट, सहकारी, शासकीय संस्थांनी कृषी व अन्न प्रक्रिया उद्योग उभारणी किंवा त्यांचे विस्तारीकरण, स्तरवृद्धी व आधुनिकीकरण करण्यासाठी प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेत सहभाग नोंदवावा. प्रकल्प आराखडे तयार करणे, बँकेकडे सादर करणे, तसेच नोंदणीसाठी कृषी विभागाकडून जिल्हा संसाधन व्यक्तीमार्फत सहाय्य केले जाणार आहे. आत्मातील नोंदणीकृत शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी व वैयक्तिक शेतकरी यांनी प्रकल्प करतेवेळी प्रधानमंत्री सूक्ष्म खाद्य उद्योग योजनेसोबत कृषी पायाभूत योजनेची सांगड घातल्यास अनुदानासोबत तीन टक्के व्याजात सवलत मिळणार आहे. जिल्ह्यात आत्मनिर्भर भारत पॅकेज अंतर्गत प्रधानमंत्री सूक्ष्म खाद्य अन्न प्रक्रिया योजना सन २०२३-२४ अंतर्गत वैयक्तिक घटकांचे ४३७ लक्षांक प्राप्त झाले आहे. त्यापैकी ३९१ लक्षांक साध्य झाले आहेत. यात ३९१ लाभार्थीना १३.५० कोटी रुपयाचे अनुदान कृषि विभागामार्फत वितरीत करण्यात आले आहे. त्यानुसार जिल्ह्यात ३९१ उद्योग सुरु करण्यात आले आहे. २०२४-२५ करिता वैयक्तिक घटकांचे लक्षांक ४१५ प्राप्त झाले आहे. यासाठी लाभार्थ्यांनी अर्ज करावे, अर्ज करताना कृषि सहाय्यक आणि तालुका कृषि अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा. अधिक माहितीसाठी pmfme.mofpi.gov.in या वेबसाईटवरील माहिती घ्यावी, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी मनोजकुमार ढगे यांनी केले आहे.

# संतापजनक, युवतीकडून अल्पवयीन मुलीचा विनयभंग

## समाजमाध्यमावर पीडितेचे आक्षेपार्ह फोटो व्हायरल



**जनसंचलन/ संग्रामपूर**
तालुक्यातील एका गावातील २४ वर्षीय युवतीने गावातीलच १४ वर्षीय मुलीचा विनयभंग केल्याची घटना १८ ते २८ मे दरम्यान घडली. याप्रकरणी तामगाव पोलिसांनी ३० मे रोजी गुन्हा दाखल केला. अल्पवयीन मुलगी घरात एकटी असताना २४ वर्षीय युवती तिच्या घरात गेली. घराचा दरवाजा बंद करून पीडित मुलीला कपडे काढायला सांगितले. मात्र, अल्पवयीन मुलीने कपडे काढण्यास नकार दिला. त्यावेळी आरोपी युवतीने जिवे मारण्याची धमकी देत पीडितेला अर्धनग्न केले. तसेच भ्रमणध्वनीमध्ये पीडितेचे फोटो काढले. त्यानंतर आरोपी युवतीने अल्पवयीन मुलीसोबत नको ते चाळे करायला सुरुवात केली. पीडितेने आरडाओरड करताच आरोपी युवतीने घरातून पळ काढला. आरोपी युवती इथेच थांबली नाही. तिने समाज माध्यमावर बनावट नावाने अकाऊंट तयार करून अल्पवयीन मुलीचे फोटो अपलोड केले. युवतीने अल्पवयीन मुलीची छेड काढत तिच्याशी पुरुषी लगट करत विनयभंग केल्याची ही पहिलीच घटना संग्रामपूर तालुक्यात उघडकीस आली. दरम्यान, अल्पवयीन मुलीच्या फिर्यादीवरून तामगाव पोलिस ठाण्यात आरोपी २४ वर्षीय युवतीवर कलम ४५२, ३५४, ३५४ (अ), ३५४ (ब), ३४२, ५०६, भादंविसह आर डब्ल्यू ८, १२, १४ पोक्सो, आरडब्ल्यू ६७ माहिती तंत्रज्ञान कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. घटनेचा तपास उपविभागीय पोलिस अधिकारी मलकापूर यांच्या आदेशाने जळगाव जामोदचे पोलिस निरीक्षक आनंद महाजन यांच्याकडे देण्यात आले.

# दुचाकी अडवून दोन हजार रुपये हिसकले

**जनसंचलन/खामगाव**
बहिणीवरील उपचार करून परतत असलेल्या एका दुचाकीस्वाराला रस्त्यात अडवून धक्काबुक्की केली. तसेच तिघांनी बहीण-भावंडांना मारहाण करीत दुचाकी चालकाच्या खिशातील दोन हजार रुपये हिसकले. खामगाव पिंपळगाव राजा रोडवरील राहुड फाट्यानजीक ही घटना गुरुवारी रात्री घडली. याप्रकरणी पिंपळगाव राजा पोलिसांनी तिघांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. तक्रारीनुसार, आवेश उल्लाखान अशफाक उल्लाखान (३२, रा. मारवाडी गल्ली पिंपळगाव राजा) गुरुवारी आजारी असलेल्या बहिणीची तब्येत दाखवून पिंपळगाव राजा येथे एमएच ३० झेड ९९५२ या दुचाकीने परतत होते. त्यावेळी राहुड फाट्याजवळ हरिदास सोंळके, महादेव गाडगे, नीलेश संतोष क्षीरसागर (२४, सर्व रा. जळका भडंग) यांनी दुचाकी अडविली. तसेच त्यांना धक्काबुक्की केली आणि दोन हजार रुपये जबरदस्तीने हिसकावून पळ काढला.

# अखेर वाघाची मृत्यूशी झूंज संपली

## पँथर चळवळीचे भाई सोमचंद्र दाभाडे यांचे निधन


भाई सोमचंद्र दाभाडे

**जनसंचलन/बुलढाणा**
दलित पँथर चळवळीतील भाई सोमचंद्र दाभाडे यांचं आज दुःखद निधन झाले आहे. ते काही वर्षांपासून किडनीध्या आजाराने त्रस्त होते. त्यांनी अन्न पाणी सोडल्याने प्रकृती खालावत गेली. भाईंनी समस्त जीवन बोधिसत्व परमपूज्य डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर त्यांच्या विचाराशी कार्याशी त्यांनी पुकारलेल्या मानवतावादी लढ्याशी समर्पित आहे. अन्याय करणारा पेक्षा अन्याय सहन करणारा गुन्हेगार असतो गुलामाला त्याच्या गुलामीची जाणीव करून द्या म्हणजे तो पेटून उठेल विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे क्रांतिकारी मानव मुक्तीचे विचार घेऊन महाराष्ट्रामध्ये व देशांमध्ये अनेक कार्यकर्ते स्वतःच्या घरादाराचा कुटुंबाचा विचार न करता डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी जो मानव मुक्तीचा लढा पुकारला होता त्या लढ्यामध्ये आपलं सर्वस्व अर्पण केलं. अशा त्यागी कार्यकर्त्या मुळे मनुवादी वर्ण वर्चस्ववादी सनातनी प्रस्थापित समाज व्यवस्थेला हादरे देण्याचे काम मोठ्या प्रमाणावर झालं, महाराष्ट्रामध्ये पैंथर चळवळीचा इतिहास अशाच प्रकारचा आहे. भारतीय दलित पँथर तरुण कार्यकर्त्यांनी आंबेडकरी समाजाला आत्ममान दिलं अस्मिता दिली. मोडेल पण वाकणार नाही असा पँथर तरुणाईचा बाणा होता. त्यापैकीच एक बुलढाणा डॉक्टर जिल्ह्यामधील बाबासाहेब आंबेडकरांच्या स्वाभिमानी विचाराने पेटून उठलेले एक स्वाभिमानी कमालीचं निडर निर्भय अशा प्रकारचं चरित्र संपन्न व्यक्तिमत्व भाई सोमचंद्र दाभाडे यांचा समस्त जीवन आणि कार्य आंबेडकरी चळवळीमध्ये परिवर्तन चळवळीमध्ये काम करणाऱ्या समोर दीपस्तंभ प्रमाणे आहे, त्यांचं संपूर्ण आयुष्य बहुजन समाजावर होणाऱ्या अन्याय अत्याचार विरोधात लढण्यामध्ये गेलं. त्यांनी स्वतःच्या घरादाराचा कुटुंबाचा विचार न करता ज्या ज्या ठिकाणी अन्याय अत्याचाराच्या घटना घडत असतील त्या त्या ठिकाणी ते जात अन्याय मनोवादी वर्ण वर्चस्ववादी प्रवृत्तीला ते ठेचून काढत. तारुण्यात आपल्या भविष्याचा विचार कधी केलाच नाही. नामांतरचा लढा असेल, गायरान जमीन अतिक्रमणे प्रकरणाचे आंदोलने, अन्याय अत्याचार कुटूंबाचे न्याय मिळवून देण्यासाठी आंदोलने, बहीष्कार- राच्या घटना, सार्वजनिक पाणवठ्यावर पाणी न भरू देण्यासाठीचे आंदोलने, महीलावरिल अतियाचारांच्या घटना, विद्यार्थी शिष्यवृत्तीचे आंदोलन भाई सोमचंद्र दाभाडे यांच्या निधनाने दलित पँथरचा सुर्यास्त झाल्याची शोकभावना विविध स्तरातून व्यक्त केल्या होत आहे.

# कर्नाटकात काँग्रेसला मोठा धक्का, भाजपला २० ते २२ जागा, एक्झिट पोलचे आकडे काय सांगतात?

वृत्तसंस्था/ नवी दिल्ली

कर्नाटकात काँग्रेसला मोठा धक्का, भाजपला २० ते २२ जागा, एक्झिट पोलचे आकडे काय सांगतात? बंगळुरु: लोकसभा निवडणुकांसाठी मतदान पूर्ण झालं असून ४ जूनला निकाल लागणार आहे. निकालांपूर्वी आज निवडणुकांचे एक्झिट पोल आले आहेत. इंडिया टुडे-एक्सिस माय इंडियाच्या एक्झिट पोल बघता कर्नाटकात एनडीएला २० ते २२ जागा मिळताना दिसत आहे. तर इंडिया आघाडीला फक्त ३ ते ५ जागा मिळणार आहेत. त्यामुळे एक्झिट पोलच्या आकड्यानुसार यंदाही कर्नाटकात भाजपचं सरकार बनताना दिसत आहे. मतदानाच्या टक्केवारीत एनडीएला ५५ टक्के तर इंडिया आघाडीला ४१ टक्के मत आणि इतर ला ४ टक्के मत मिळताना दिसत आहे.कर्नाटकच्या २८ जागांवर २६ एप्रिल आणि ७ मे ला दोन भागात मतदान पार पडलं. २६ एप्रिलला कर्नाटकच्या १४ जागा ज्यामध्ये उडुपी-चिकमंगलूर, हासन, दक्षिण कन्नड, चित्रदुर्गा, तुमकुर, मांड्या, मैसूर, चामराजनगर, बंगळुरु ग्रामीण, बंगळुरु उत्तर, बंगळुरु सेंट्रल, बंगळुरु दक्षिण, चिकबलपूर आणि कोलार यांचा समावेश आहे. ७ मेला उर्वरित १४ जागा चिकोडी, बेलगाम, बागलकोट, बीजापूर, गुलबर्गा, रायचूर, बीदर, कोप्पल, बेल्लारी, हावेरी, धारवाड, उत्तर कन्नड, दावणगेरे आणि शिमोगा येथे मतदान झालं. कर्नाटकात पहिल्या फेजमध्ये १४ जागांवर ६९.९६ टक्के मतदान




झालं. तर दुसऱ्या फेजमध्ये १४ जागांवर ६९.५६ टक्के मतदान झालं.गेल्या निवडणुकीत कर्नाटकात २०१९ मध्ये भाजपला २५ जागा मिळाल्या होत्या, तर काँग्रेसने १ आणि जेडीएसने १ जागेवर विजय मिळवला होता. तर अपक्षने १ जागा जिंकली होती

## बाजार समिती सभापती शिवचंद्र तायडे विरोधात अविश्वास प्रस्ताव वेळी दोन्ही भाजप अमोरासमोर

जनसंचलन/मलकापूर

मलकापूर मतदार संघात दोन्ही भाजव समोरासमोर आल्याने वातावरण तापलं बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर विधानसभा मतदारसंघात भाजपामध्ये उभी फूड पडली आहे. भाजपचे माजी आमदार चैनसुख संचेती यांनी भाजपच्याच बाजार समितीच्या सभापती विरोधात अविश्वास प्रस्ताव आणला आहे. या प्रस्तावावर आज कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभागृहामध्ये मतदान घेतल्या वेळी भाजप चे शिवचंद्र तायडे आणि चैनसुख संचेती यांचे दोन्ही गट अमोरसमोर येऊन त्या ठिकाणी चांगला राडा झाला पोलिसांनी त्यांना पंगविण्यासाठी काही प्रमाणात बळाचा करावा लागला तर त्या ठिकाणी अगोदरच १४४ कलम



लागू करत जमावबंदी करण्यात आली होती मात्र दोन्ही गट अमोरसमोर आल्याने मोठा राडा झाला

## पातुर्डा येथे गोठ्याला लागली आग,गुरे भाजली

जनसंचलन/ पातुर्डा

येथील प्रभाग क्रमांक ३ मधील गुरांच्या गोठ्याला शनिवारी दुपारी आग लागली. यात गाय, बकरी, मेंढ्या व इतर प्राणी भाजले. यासह शेतीपयोगी साहित्य जळाल्याने लाखोंचे नुकसान झाले. शॉर्टसर्किटमुळे आग लागली असावी, असा अंदाज स्थानिकांनी व्यक्त केला. धनगरपुरा भागात गजानन रोठे, जगन्नाथ रोठे, ईश्वर रोठे, रामदास गंगतीरे यांचे गुरांचे गोठे आहेत. या गोठ्यात शेतीचे साहित्य ठेवले होते. शनिवारी दुपारी १ वाजता शॉर्टसर्किटमुळे गोठ्यातील कुटाराने पेट घेतला. गोठ्यात ठेवलेले स्प्रिंकलर सेट, लाकडी वखर, डवरे, तिफन, ताडपत्री, मशीन, मोटरपंप आदी वस्तू आगीच्या भक्षी पडल्या. सोबतच ज्वारी व मका जळून खाक झाले. गाय, वगार, मेंढी, बकरी, म्हैस असे प्राणी भाजल्याने जखमी आहेत. जखमीवर येथेच उपचार सुरू आहेत. काही प्राणी चिंताजनक अवस्थेत आहेत. शेगाव येथील अग्निशमन दलाने माहिती मिळताच



घटनास्थळावर हजेरी लावली. राष्ट्र प्रथम संघटनेकडून पिण्याच्या पाण्यासाठी सुरू असणा-या टँकरद्वारे त्वरित आग विझवण्याचे प्रयत्न झाल्याने आग आटोक्यात आली. स्थानिकांनीही पाणी व रेती फेकत आगीवर नियंत्रणाचा प्रयत्न केला.

## विदर्भात सर्वांनी झाडे लावण्याकडे भर द्या-पवन चव्हाण

जनसंचलन/ खामगाव

विदर्भात वाढत्या उष्णतेकडे पाहता. सर्वांनी आपल्या घरी, अंगणात, शेतात आणि आपल्या आजूबाजूच्या परिसरात झाडे लावणे काळाची गरज बनली आहे. सध्या विदर्भात उष्णतेचा पारा हा दरवर्षीच्या तुलनेत ४८ च्या पार चढला आहे. अगोदर तापमान थोडे कमी असायचे मात्र दिवसेंदिवस काळ बदलत चालला आहे तापमानाचे प्रमाण उच्चांक गाठत आहे. अकोला, खामगाव, ह्या शहरामध्ये रस्त्यावर निघणे सुद्धा कठीण झाले आहे. वाढत्या इमारती आणि औद्योगिकरण यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षतोड झालेली आहे. मात्र वृक्षरोपणांकडे कोणाचेही लक्ष नाही. या कडे नागरिकांचा आणि तरुणांचा कल असणे आवश्यक आहे. लोणावळा आणि उच्च वृक्ष असलेल्या प्रदेशात संतुलित पाऊस आणि नियंत्रित उष्णतेचा पारा आहे. कारण इथे वृक्षांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आहे.



आणि यामुळेच इथे दळणवळण आणि पर्यटन स्थळ महाराष्ट्राच्या नकाशावर प्रसिद्ध झाले आहे.आपल्या विदर्भात सुद्धा येणारी उष्णतेची लाट भयानक होऊ शकते त्यामुळे आत्ताच सर्वांनी वृक्षरोपणाकडे भर द्यायला हवे. व सर्वांनी ह्या उन्हाच्या लाटेत डोक्याला रुमाल व सोबत पाण्याची बॉटल घेऊन घराबाहेर पडावे व वयोवृद्ध नागरिकांनी काळजी घ्यावे असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते पवन चव्हाण यांनी विचार मांडताना केले आहे.

## रस्ता अपघातातील जखमीचा मृत्यू

जनसंचलन/ खामगाव

वाहनावरील ताबा सुटल्याने दुचाकी घसरून झालेल्या अपघातातील गंभीर जखमीचा नागपूर येथे उपचारादरम्यान मृत्यू झाला. विशाल रघुराज सिंह ठाकूर (रा. कोठारी फैल) हे एमएच-२८, बीयू-३८४० दुचाकीने २२ एप्रिल रोजी समता कॉलनी भागातील पाण्याच्या टाकीजवळून जात होते. त्यावेळी त्यांचा अपघात झाला होता जखमी अवस्थेत त्यांना नागपूर येथे हलविण्यात आले होते.